महावितरण

# जाहीर निवेदन

मुख्य अभियंता, महावितरण, परिमंडळ कार्यालय, नांदेड यांच्या आस्थापनेवर सन २०२३-२४ करिता NATS अंतर्गत विद्युत पदवि/ पदविका अभियांत्रिकी (Designated Course) या स्वतंत्र व्यवसायासाठी विद्युत पदवि/ पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवाराकडुन एक वर्ष कालावधी करिता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी (Electrical Engineering Degree/ Diploma) विद्युत अभियांत्रिकी पदवि-१९ व पदविका-९ अशी एकूण २८ पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी दिनांक १५.११.२०२३ (२४.००) पर्यंत https://nats.education.gov.in या संकेत स्थळावर आस्थापना कोड WMHNDS000006 वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत दिनांक १५.११.२०२३ (२४.००) नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांची निवड ही एकूण गुणाच्या टक्केवारी (Merit) नुसार मुळ जाहिरातीच्या अटी व शर्ती च्या अधिन राहून करण्यात येईल.

१. उमेदवार विद्युत पदवि/ पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम सन २०२० नंतरचा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराचे दिनांक १५.११.२०२३ अखेर किमान वय १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. [redacted] [redacted]
३. सदर भरती करिता नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नांदेड परिमंडळ कार्यालय अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली मंडळांतर्गत वर्ग करण्यात येईल.
४. विद्यावेतन नियमाप्रमाणे मिळेल.
५. शिकाऊ उमेदवार यांनी पोर्टलवर रजिस्ट्रेशन करणे व ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे.
६. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावर अथवा NATS Portal व्दारे पुढील कार्यवाही बाबत कळविण्यात येईल.
७. मुळ कागदपत्रे तपासणी वेळी काही तफावत अथवा माहिती चुकीची आढळल्यास उमेदवारांची निवड कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. टीप - भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे, नमुद पदे कमी-जास्त करण्याचे, भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवित आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

मुख्य अभियंता
महावितरण, नांदेड परिमंडळ, नांदेड

PRO No. १३७ - ३१/१०/२०२३

www.A1noukri.com